सं. फौ. खटला क्र. ४४४/२०२२
महाराष्ट्र शासन वि. जगदीश.
नि.क्र.०३/ब
**CNR No.MHRG090008352022**

रोहा येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड यांच्या न्यायालयात

(पिठासीन अधिकारी श्री. एस. एस. महाले.)

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याची तारीख | ०४/११/२०२२ |
| २ | प्रथम माहिती अहवाल व पोलीस ठाणे | नागोठणे गु.र.नं. १७१/२०२२ |
| ३ | प्रथम माहिती अहवाल दाखल दिनांक | ०४/११/२०२२ |
| ४ | फिर्यादी/अहवाल देणार | श्री. एम.व्ही.म्हात्रे, पो.ना. ब.क्र. १३७५, नागोठणे पोलीस ठाणे. |
| ५ | आरोपीचे नाव, वय व पत्ता | जगदीश यशवंत म्हात्रे, वय– ३९ वर्षे, रा. शिहू, ता.पेण, जि.रायगड. |

६ आरोपीस सांगावयाचे अपराधाचे विवरण –

तुम्ही दि.०४/११/२०२२ रोजी सकाळी ११.४० वा. च्या सुमारास या न्यायालयाचे स्थळसिमेत, मौजे नागोठणे बाजारपेठेतील दिपक पावभाजी सेंटर समोरील नागोठणे ते रिलायन्स चौक सार्वजनीक रस्त्यावर तुम्ही तुमच्या ताब्यातील मिनीडोअर नोंदणी क्र. एम.एच.०६/जे/१३९८ ही सार्वजनिक रोडवरील वाहतुकीस धोकादायक व अडथळा होईल अशा रितीने उभी केली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम २८३ अन्वये गुन्हा केला आहे.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्हयाकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

आरोपीला अपराधाचे विवरण त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगीतले.

७ आरोपीचे प्रतिकथन –

१. तुम्हाला आरोपपत्र व संपूर्ण कागदपत्रांच्या नकला मिळाल्या आहेत काय? उत्तर– होय.

२. तुम्हाला समजावून सांगीतलेला उपरोक्त गुन्हयाचा तपशील समजला आहे काय? उत्तर– होय.

३. तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय? उत्तर– मला गुन्हा कबुल आहे.

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2022.11.12 18:27:15 +0530

आरोपीची सही

दिनांक – १२.११.२०२२

(श्री. एस. एस. महाले)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

## न्यायनिर्णय

८ आरोपीने अर्ज नि.क्र.२ दाखल करुन स्वेच्छेने गुन्हा कबूल केला. आरोपीने शिक्षा देते वेळेस सहानुभुती दाखवावी अशी विनंती केली आहे. आरोपीने स्वेच्छेने गुन्ह्याची कबुली दिली आहे अशी माझी खात्री झाली आहे. म्हणून आरोपीची कबूली स्विकारण्यात येते. आरोपीला खालील शिक्षा सुनावण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५२ भारतीय दंड संहिता कलम **२८३** अन्वये दंडनीय गुन्ह्याकरीता दोषी धरण्यात येते.

२. आरोपीला भारतीय दंड संहिता कलम **२८३** अन्वये दंडनीय गुन्हयाकरीता रक्कम रूपये २००/– (अक्षरी रक्कम रूपये दोनशे मात्र) द्रव्य दंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. आरोपीने द्रव्य दंडाची रक्कम भरण्यास कसूर केल्यास पाच दिवसांची साधी कैद सुनावण्यात येते.

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2022.11.12 18:27:21 +0530

स्थळ : रोहा.

दिनांक – १२.११.२०२२

(श्री. एस. एस. महाले)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.